# पदक विजेत्या खेळाडूंना पुणे विद्यापीठाची शिष्यवृत्ती

पुणे, दि. २५ (क्रीडा प्रतिनिधी) : पुणे विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक गटातील पहिल्या तीन पदक विजेत्यांना रोख शिष्यवृत्तीची घोषणा करून कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी खेळाडूंना एक अनोखी भेट दिली. महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या इतिहासातील विजेत्या खेळाडूंना शिष्यवृत्तीची घोषणा करणारे पुणे विद्यापीठ हे पहिलेच विद्यापीठ ठरले आहे.

पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या वतीने २००७-०८ या वर्षात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विविध संघातील विजयी खेळाडूंसाठी पारितोषिक वितरण समारंभ आज आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. जाधव यांनी वरील घोषणा केली. ते पुढे म्हणाले, की अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत वैयक्तिक गटात पुणे विद्यापीठच्या खेळाडूने जर सुवर्ण पदक जिंकले तर सात हजार, रौप्य पदक जिंकले तर पाच हजार व कांस्य पदक जिंकले तर तीन हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येईल. सांघिक खेळांमध्ये सुवर्ण पदक विजेत्या संघातील प्रत्येक खेळाडूंना सहा हजार, रौप्य पदक विजेत्याला चार हजार व कांस्य पदक विजेत्यांना दोन हजार रुपयांची शिष्यवृत्ती त्या वर्षासाठी एकदाच दिली जाईल. डॉ. जाधव पुढे म्हणाले, की पुणे विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धांना जाणाऱ्या संघांनी व खेळाडूंनी जास्तीत जास्त चांगली कामगिरी करून पुणे विद्यापीठचे नाव अखिल भारतीय पातळीवर गाजवावे यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. यावर्षी जे संघ व खेळाडू अखिल भारतीय स्पर्धेत पदक विजेते असतील त्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ होणार आहे.

## कुलगुरूंची घोषणा

अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत पदक विजेत्या व चांगली कामगिरी केलेल्या सुमारे साडेतीनशे खेळाडूंचा व त्यांच्याबरोबर गेलेल्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांचा सत्कार कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, राज्याचे क्रीडा सहसंचालक नरेंद्र सोपल, राष्ट्रीय ज्युदो खेळाडू व छत्रपती पुरस्कार विजेता योगेश दांगट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी विद्यार्थी कल्याण मंडळ संचालक डॉ. संभाजी पठारे, पुणे शहर, नाशिक, नगर व पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या अनेक महाविद्यालयातील क्रीडा संचालक या वेळी उपस्थित होते.

लोकमत 26/3/08.

चिंतन इमेज मेकर्स

# पुणे विद्यापीठ देणार खेळाडूंना रोख पारितोषिक

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी)- खेळांमध्ये विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या खेळाडूंना यंदापासून रोख रकमांची पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. असा नावीण्यपूर्ण, प्रेरणादायी आणि आधार देणारा उपक्रम पुणे विद्यापीठ राबवित आहे, असे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे सांगितले.

विद्यापीठातर्फे आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत या वर्षी भाग घेतलेल्या विविध संघातील विजयी खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या वेळी डॉ. जाधव बोलत होते. याप्रसंगी राज्याचे क्रीडा उपसंचालक नरेंद्र सोपल, राष्ट्रीय ज्युदो खेळाडू योगेश दांगट, कुलसचिव माणिक जाधव, प्रा. दीपक माने, डॉ. संभाजी पठारे आदी उपस्थित होते.

या समारंभात यशोधन लोणकर यास 'सर्वोत्कृष्ट खेळाडू'चे पारितोषिक प्रदान करण्यात आले. या वेळी बाळासाहेब लांडगे, सोनम धानुरे, सोनाली हर्णे, नेहा नाईक, अनिरुद्ध देशपांडे, मोनल कटके, प्रियंका देसाई, पल्लवी कुलकर्णी, उमा घोंडे, सौरभ कोकाटे या खेळाडूंनाही उल्लेखनीय यशाबद्दल गौरविण्यात आले.

प्रभात 26/3/08

# क्रांतिकारकांच्या विचारांची गरज - डॉ. जाधव

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) - स्वातंत्र्यपूर्व काळात जेवढी क्रांतिकारकांच्या विचारांची गरज होती, तेवढीच आजही आहे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे 'जात-वर्ग आणि सशस्त्र क्रांतिकारक' या विषयावरील या परिसंवादात डॉ. नरेंद्र जाधव बोलत होते. माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत, शिवाजी विद्यापीठाचे डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. चमनलाल दाता देसाई या वेळी उपस्थित होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि कामद', 'काच, पत्रा वेचणाऱ्या महिलांचे प्रश्न' या विषयावरील अहवालाचे प्रकाशन डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले.

डॉ. जाधव म्हणाले, ज्यांचे सामाजिक व राजकीय नेतृत्व नुसते बोलण्यापुरते नव्हे, तर ते आचरणातही आणत होते, अशाच विषयाचा, व्यक्तींचा परिसंवादात समावेश केला जातो. या परिसंवादावरील छापील अहवाल प्रकाशित करण्यात येणार आहे. भावी पिढीतील विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना तो उपयुक्त ठरेल. पी. बी. सावंत म्हणाले, आजच्या प्रत्येक तरुणामध्ये भगतसिंगांसारखी चेतना, स्फूर्ती, देशाभिमान निर्माण झाला पाहिजे. देशाचे काही तरी देणे लागतो, ही भावना प्रत्येक हिंदुस्थानीच्या मनामध्ये निर्माण झाली पाहिजे.

सामना 29/3/08

# शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करण्याची गरज

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे मत

श्रीपूर, जि. सोलापूर (प्रतिनिधी) : केंद्र सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीचा निर्णय ऐतिहासिक आहे; परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर तो अंतिम निर्णय होणार नाही. कर्जमाफीने प्रश्न सुटणार नसून, शेतकऱ्यांना स्वतःच्या पायांवर उभे करीत आत्मनिर्भर करण्याची गरज आहे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

माळीनगर येथील दि सासवड माळी एज्युकेशनच्या आयटीसी इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर अ. भा. माळी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकांत कुदळे, माळीनगर कारखान्याचे अध्यक्ष विजयकांत कुदळे, उपाध्यक्ष ॲड. हरिभाऊ भोंगळे, व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र गिरमे उपस्थित होते.

श्री. जाधव म्हणाले, की १९९७ ते २००५ या नऊ वर्षांत देशात दीड लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश राज्यांत हे प्रमाण सर्वाधिक आहे. राज्यात विदर्भात आत्महत्येचे प्रमाण जास्त असल्याने राज्यशासनाने माझी एकसदस्यीय समिती नियुक्त केली आहे. समितीचा अहवाल तयार केला जात असून, अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्याची कार्यकक्षा वाढविण्यात आली आहे. देशात उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या विकासाचा वेग वाढला आहे; परंतु कृषी क्षेत्राच्या विकासाचा वेग वाढला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

विजयकांत कुदळे यांनी प्रास्ताविक केले. शिक्षण संस्थेचे सचिव राजेंद्र गिरमे यांनी शिक्षण संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. सुरेंद्र बधे यांनी सूत्रसंचालन केले. वैभव गिरमे यांनी आभार मानले.

ॲग्रोवन 26/3/08